सकाळ

नळेगाव : अल फारुख उर्दु विद्यालयात सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थी.

विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

नळेगाव : अलफारुख उर्दू विद्यालय येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डिजिटल युगात इंटरनेट, मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. 'सायबर सुरक्षा शिक्षण आणि आरोग्य'तर्फे राबविण्यात येणाऱ्या सायबर सुरक्षेसाठी 'सायबर शिक्षा'अंतर्गत या कार्यशाळेत जान्हवी सोरटे आणि जोहा कोतवाल यांनी विद्यार्थ्यांना फिशिंग, मजबूत पासवर्ड तयार करणे, ओटीपी व वैयक्तिक माहिती कोणालाही शेअर न करणे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ऑनलाइन फसवणूक ओळखणे, डिजिटल पेमेंट करताना घ्यावयाची काळजी तसेच सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत सोप्या आणि प्रभावी भाषेत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना संशयास्पद लिंक, बनावट संदेश, फसवे फोन कॉल आणि ऑनलाइन गेमिंगमधील फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच सायबर गुन्हा घडल्यास तात्काळ राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा आणि अधिकृत सायबर क्राइम पोर्टलवर तक्रार नोंदवावी, अशी माहिती देण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक वहाब जागीरदार,मुख्याध्यापक कादीर जागीरदार, मुजीब शेख, हाशमी मैनोद्दीन, हुसैन घोरवाडे, इर्शाद पिरजादे, युनूस शेख आदींसह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.